# प्रेस नोट

| युनिटचे नाव | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,बुलडाणा |
|---|---|
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | आलोसे श्री.डॉ.सचिन पांडुरंग वासेकर,वय ४२ वर्ष, पद–वैद्यकीय अधिक्षक, वर्ग–१ ,स्त्री रूग्णालय,धाड रोड,बुलढाणा, ता.जि.बुलढाणा रा.साई आपर्टमेंट फ्लॅाट नं.१५,कुरेशी ले आऊट,ता.जि.बुलढाणा |
| लाच मागणी | ४८,०००/–रुपये |
| लाच स्विकारली | ४८,०००/– रुपये |
| घटनास्थळ | धाड नाका ता.जि. बुलढाणा |
| घटना तारीख | २३.१२.२०२३ |

**थोडक्यात हकीकत** :–यातील तक्रारदार हे जिल्हा स्त्री रूग्णालय येथे कंत्राटी पध्दतीने कार्यरत असून त्यांनी जिल्हा स्त्री रूग्णालय येथे दिलेल्या तीन महिन्याच्या कालावधीमध्ये बजावलेल्या कर्तव्याचे एकूण ६,००,०००/– रूपये तक्रारदार यांना प्राप्त झालेले आहेत. तक्रारदार यांना लावण्यात आलेल्या ड्युटीवरून निघालेल्या एकूण ६,००,०००/– रूपये बिलाचा मोबदला म्हणून ८% प्रमाणे ४८,०००/– रूपये डॉ.वासेकर,वैदकीय अभिक्षक लाचेची मागणी करित असल्याबाबत तक्रार लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बुलडाणा घटकाकडे केली होती.

त्यानुसार दिनांक २२.१२.२०२३ रोजी लाचमागणी पडताळणी कार्यवाही आयोजीत केली असता, लोकसेवक श्री.डॉ.सचिन वासेकर,वैदकीय अधिक्षक,जिल्हा स्त्री रुग्णालय, बुलढाणा यांनी तक्रारदार यांची लावण्यात आलेल्या ड्युटीवरून निघालेल्या बिलाच्या ८% प्रमाणे ४८,०००/– रुपये लाच मागणी करुन दिनांक २३.१२.२०२३ रोजी आयोजीत सापळा कारवाई दरम्यान आलोसे श्री.डॉ. सचिन वासेकर,वैदकीय अभिक्षक यांनी तक्रारदार यांचेकडुन ४८,०००/– रुपये लाच रक्कम स्वीकारतांना रंगेहात पकडण्यात आले आहे. त्यावरून त्यांचे विरुद्ध पोलीस स्टेशन बुलढाणा शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदर कार्यवाही :– १.मा.श्री.मारुती जगताप, पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो,
अमरावती, परिक्षेत्र अमरावती
२.मा.श्री.देविदास घेवारे,अप्पर पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो,
अमरावती, परिक्षेत्र अमरावती

यांचे मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी श्रीमती शितल घोगरे, पोलीस उपअधिक्षक, एएसआय/शाम भांगे,पोहेकॉ/विलास साखरे,प्रविण बैरागी,मो.रिजवान,राजू क्षीरसागर,पोना/विनोद लोखंडे, जगदीश पवार, पोकॉ गौरव खत्री,शैलश सोनवणे, मपोकॉ/स्वाती वाणी, चापोकॉ/अर्शद शेख अॅन्टी करप्शन ब्युरो, बुलडाणा यांनी पार पाडली.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत अॅन्टी करप्शन ब्यरो बुलडाणा. कार्यालय दुरध्वनी कमांक ०७२६२–२४२५४८ व ९६५७०६६४५५ तसेच टोल फ्रि कमांक १०६४ यावर संपर्क साधण्याचे आवाहन पोलीस उपअधिक्षक,अॅन्टी करप्शन ब्युरो,बुलडाणा यांनी केले आहे.

( श्रीमती शितल घोगरे )
पोलीस उपअधिक्षक,
अॅन्टी करप्शन ब्युरो बुलडाणा

Scanned with CamScanner